प्रिय एम. फ़ील. व पी. एच.डी धारक बंधुंनो,

अलीकडे मा. सुप्रीम कोर्टाद्वारे नेट-सेट पात्रता अनिवार्य असल्याबाबतचा निर्वाडा दिलेला आहे. हा निकाल अशा एम. फ़ील. व पी. एच.डी धारकांना लागु होतो जे एम. फ़ील. व पी. एच.डी धारक अद्याप नोकरीत लागलेले नाहीत. हा निकाल कट-ऑफ़ डेट साठी न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचीकेच्या संदर्भातला आहे आणि या निकालाचा नोकरी करित असलेल्या एम. फ़ील. व पी. एच.डी धारक प्राध्यापकांशी काहीही संबंध नाही. परंतू काही असमाजीक तत्वांद्वारे या निकालाचा वेगळा अर्थ लावून भितीचे वातावरण निर्माण केल्या जात आहे. अशा निर्बुध्द लोकांचे मेसेजेस वाचुन घाबरुन जाऊ नये.

२००९ पुर्वी एम. फ़ील. झालेल्या परंतु अद्याप नौकरीत नसलेल्या लोकांनी नेट-सेट पासुन सुट देण्यात यावी अशा आशयाची याचीका मा. न्यायालयामध्ये दाखल केलेली होती. केवळ २००९ पुर्वी एम. फ़ील. केले म्हणुन त्रुतीय अधिसुचनेमध्ये अनिवार्य असलेल्या नेट-सेट परिक्षेमधुन सुट देण्यात यावी अशी अपेक्षा बाळगने चुकीचे आहे असे मा. न्यायालयाने अलीकडे स्पष्ट केलेले आहे.

हा निकाल नोकरीत असलेल्या प्राध्यापकांना लागु होत नाही कारण त्यांच्या नोक-या पुर्णपने अधिक्रुत असुन त्यांच्या नोक-यांना कुठलाही धोका आज वा भविष्यात नाही.

सदर निकालाचा न्यायालयीन आदेश (Court Order) www.upa.org.in वर उपलब्ध आहे. इ-मेल द्वारे हवी असल्यास upanagpur@gmail.com वर संपर्क साधावा.